

येत्या दहा वर्षात पृथ्वीतलावरील प्रत्येक साक्षर व्यक्तींवर निश्चितपणे माहिती तंत्रज्ञानाच्या शक्तीचा प्रभाव पडेल. टि.व्ही., रेडिओ, वाहने किंवा सेल्युलर फोन्स इ. अन्य कोणत्याही तंत्रज्ञानापेक्षा माहिती तंत्रज्ञानाच्या स्वीकाराची गती अफाट आहे. यामुळे लवकरच आपल्या कामाच्या, वागण्याच्या आणि एकंदरच जगण्याच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल होतील. यातून विकसित होणाऱ्या ई–लाईफ स्टाईलमुळे कोणत्याही प्रकारची सेवा प्राप्त करण्यासाठी रांग लावून उभे राहात बसण्याची जीवनपद्धती लवकरच संपुष्टात येईल. जो माहिती तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा फायदा असेल.

मोठ्या संख्येने देशासाठी रोजगार निर्मिती करणाऱ्या माहिती तंत्रज्ञान या बिझीनेस प्रोसेस आऊटसोर्सिंग उद्योगाचा झपाट्याने विकास होत आहे.

माहितीच्या रूपांतरणातून येत्या दशकात फार मोठे बदल घडून येतील. तसेच मनोरंजन, संवाद तंत्रज्ञान तसेच टेलिफोन, फॅक्स, पेजर्स, संगणक, ओहन, घड्याळे हेही मोठ्या प्रमाणात बदलतील. नैसर्गिक भाषेच्या देवाण–घेवाणीतून व बोलीभाषा ओळखू शकणाऱ्या उपकरणांमुळे संवाद पद्धतीत मोठे बदल होतील. संगणक हा तर आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनून जाईल. या सर्व बदलांची माहिती तंत्रज्ञानाच्या शक्तीची जाणीव प्रत्येक व्यक्तीसाठी आवश्यक आहे. सर्व वयोगट व समाजातील सर्व विभागांसाठी माहिती तंत्रज्ञानावर 'सायबर जीनियस' हे सर्वंकष (सर्वार्थाने परिपूर्ण) असे पुस्तक लिहिल्याबद्दल मी दीपक शिकारपूर यांचे अभिनंदन करतो. मला खात्री आहे की, हे पुस्तक ग्रामीण विशेषत: मराठी भाषिक भारतीयांमध्ये माहिती तंत्रज्ञानाविषयी आवश्यक ती जाणीव जागृती निर्माण करण्यामध्ये यशस्वी होईल. या पुस्तकाचा आशय अत्यंत प्रबोधनात्मक तसेच भाषा ही अत्यंत साधी व ओघवती आहे. या पुस्तकातील संदेश हा हजारो लोकांपर्यंत जाईल, अशी मी आशा करतो.

मी दीपक यांना या पुस्तकासाठीच्या प्रामाणिक प्रयत्नांबद्दल मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

**– पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर**

उत्कर्ष प्रकाशन पुणे–४११००४